दि. ०१/०६/२०२१ मराठवाडा

# देगलूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर सेवानिवृत्त



देगलूर (वार्ताहर) - देगलूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर सर हे नियतवयोमानानुसार ३४ वर्षे सेवा करून वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत झाले आहेत.

त्यानिमित महाविद्यालयात दि. ३१ मे रोजी त्यांचा सेवागौरव सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पा. बेंबरेकर होते. व्यासपीठावर शिक्षण संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, देवेंद्र मोतेवार, जनार्धन चिद्रावार, रविंद्रअप्पा द्याडे, प्राचार्य ए.बी. चिद्रावार उपस्थित होते.

उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर हे वाणिज्य विषयाचे प्राध्यापक, विभागप्रमुख, उपप्राचार्य व प्रभारी प्राचार्य म्हणून उत्कृष्ट सेवा केलेली आहे. या काळामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अभ्यास मंडळ सदस्य म्हनुण काम केले आहे. या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य निवृती गोविंदवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व देगलूर महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी, डॉ. स्वप्निल कद्रेकर व डॉ. मयूर कद्रेकर उपस्थित होते.